# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १४/०३/२०२४ (गुरूवार) दुपार**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोदं नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक १३/०३/२०२४ रोजी पोलीस स्टेशन मौदा येथील स्टाफ पोस्टे मौदा हद्दीत पटे्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, कुभांरपूर मौदा येथे ट्रॅक्टर ट्रॉली द्वारे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून मौदा पोलीसांनी कुंभारपुरा मौदा येथे नाकाबंदी केली असता कन्हान नदीच्या कुंभारपूर घाटामध्ये एक व्यक्ती घमेले पावडयाच्या साहाय्याने ट्रॅक्टर मध्ये रेती भरताना दिसून आला. त्याला नाव, गाव विचारले असता त्याने त्याचे नाव अंकीत अरूण नागपूरे, वय २६ वर्ष असे सांगितले. सदर ट्रॅक्टरची पाहणी केली असता शेंदरी रंगाचा नंबर नसलेला ट्रॅक्टर किंमती ५,००,०००/– रु व एक पांढरा रंगाची ट्राली किंमती १,००,०००/– रू ज्यामध्ये ०१ ब्रास रेती विनारॉयल्टी किंमती ५००० रू असा एकुण ६०५०००/– रू चा मुद्देमाल चोरून नेत असताना मिळुन आल्याने जप्त करून आरोपी नामे– १) अंकीत अरूण नागपूरे, वय २६ वर्ष २) प्रफुल देविदास येळणे वय २६ वर्ष, दोन्ही रा. बोरी शिगांरदीप यांचेविरुद्ध पोस्टे मौदा येथे अप क्र. २९२/२०२४ कलम ३७९, १०९ भा.द.वी. सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक सतिशसिंग राजपूत, पोउपनि अरविंदकुमार जगणे, नापोशि रोशन पाटील, पोलीस अंमलदार सचिन हटवार यांनी केली.

## कोळसा चोरी करणारे आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

दिनांक १३/०३/२०२४ रोजी ०८.३० वा. ते ०८.४० वा. दरम्यान फिर्यादी नाम—ेसंतोष इंद्रसिंग यादव, वय २९ वर्ष रा. क्वॉटर्र नं ५२७, मडीबाबा कॉलोनी, खदान नं ३ कन्हान व फिर्यादी सोबत असलेले सुरक्षा गार्ड हे खदान नं ६ यथे गस्त पटौलींग करीत असता फिर्यादीस सोबत असलेला सुरक्षा गार्डनी माहीती दिली की यातील आरोपी क्रं. १) नामे— रोहीत धर्मपाल रंगारी रा. गोडं गाव कन्हान हे मो.सा क्रं. MH-40-BY-4310 व आरोपी क्र. २) गणेश विठोबा मोहर्ले, रा. गोडं गाव कन्हान हा मो.सा क्रं. MH-40-AD-5809 यांनी प्रतिबंधीत क्षेत्रात अनुक्रमे ३ बोरी व २ बोरी असे अंदाजे ७५० किलो कोळसा कि. ३७५०/—रू इंदर कोल डेपो येथून आरोपी क्र. १ याने आपले मोसा क्र. MH-40-BY-4310 कि १००००/रू व आरोपी क्र. २ याने मोसा क्रं. MH-40-AD-5809 किंमती ५०००/—रू. व एकुण ०५ बोरी कोळसा ७५० किलो किंमत ३७५०/—रू असा एकुण १८७५०/रू चा मदुदेमाल चोरून नेत असतानां मिळून आल्याने फिर्यादीच्या रीपोर्ट वरून पोस्टे कन्हान येथे अप क्र. २०८/२४ कलम ३७९, ३४ भांदवि अन्वये गुन्हा नोदं केला होता. कन्हान पोलीसांनी आरोपीतांना अटक केली असुन पुढील तपास पोलीस हवालदार उमाशंकर पटेल मो क, ९९७५०५००३८ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कन्हान येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**